**Major Impetus on expediting ongoing Infrastructure Project in MMR**

271st Meeting of Executive Committee meeting of Mumbai Metropolitan Region Development Authority was held today under the Chairmanship of Shri. Manu Kumar Srivastava, Hon. Chief Secretary, Government of Maharashtra. During the meeting major focus was laid on expediting and providing necessary support to the ongoing infrastructure projects in Mumbai Metropolitan Region.

Key approvals given during the meeting were as follows

1. Approval for Improvement of Road Infrastructure , Storm Water Drain, Road Furniture and otherallied work from Kasheli Toll Plaza to Anjurphata along the alignment of Mumbai Metro Line - 5 on Thane-Bhiwandi - Wadapa Road ( SSH84 ) ( CA 138 )

2. Construction of Kasarwadvali and Bhayndarpada Solid Ramps on Ghodbunder Road as additional works under CA 54 in Thane City Limits. The contractor will be carried out the construction on the basis of MCGM SOR (2018) Rate card.

3. Interim EOT (Extension of Time) granted to the General Consultant of Metro line 4 & 4A till 28th February 2025. Monetary remuneration will be paid as per the terms of the contract

4. Extension has been granted to the G.C. of Metro Line 7 up to 31st December 2022 & for Metro Line 2B up to 30th June 2024 respectively &the cost increase shall be as per the contract clauses mentioned.

5. Tender received for the construction of the Proposed DP road between Taloja MIDC to NH 4 (Old) Under Extd. MUIP‘ to be accepted & payment of the possible increase in price as per the actual work and to pay the bonus as per the terms and conditions of the contract.

6. The appointment of General Consultant was approved for the Implementation of the Construction and System Work of both Metro Line-10 (Gaimukh - Shivaji Chowk (Mira Road)) and Metro Line 12 (Kalyan- Taloja).

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २७१ वी बैठक संपन्न

मुंबई, २९ जुलै, २०२२ -प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २७१ वी बैठक श्री. मनुकुमार श्रीवास्तव, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

सदर बैठकीमध्ये मेट्रो मार्ग ५ (ठाणे - भिवंडी - कल्याण) मेट्रो मार्गिकेतील ठाणे - भिवंडी - वडपा (वि.रा.म.- ८४) रस्त्यावरील कशेळी पथकर नाका ते अंजुरफाटा दरम्यान रस्त्याची पायाभूत सुधारणा, स्ट्रॉम वॉटर ड्रेन, रोड फर्निचर व इतर संबंधित कामासाठी (पॅकेज सी.ए.- १३८) मागविण्यात आलेल्या ई - निविदेसाठी मंजूरी देण्यात आली आहे.

ठाणे परिक्षेत्रातील घोडबंदर मार्गावर प्रस्तावित असलेल्या कासारवडवली आणि भाईंदरपाडा या दोन उड्डाणपुलांचे बांधकाम, मेट्रो मार्ग-४अ मधील सीए ५४चे बांधकाम करीत असलेल्या कंत्राटदारामार्फत करण्यात येणार असून, सदर कंत्राटदारास MCGM SOR (2018) च्या दरसूची प्रमाणेच्या किंमतीवर बांधकाम करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मेट्रो मार्ग - ४ व ४ अ च्या साधारण सल्लागारास  दिनांक २८ फेब्रुवारी , २०२५ पर्यंत द्यावयाच्या मुदत वाढीसाठीच्या प्रस्तावास, तसेच करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासहच्या अधिदानास मान्यता देण्यात आली आहे.

मेट्रो मार्ग ७ व मेट्रो मार्ग २ब प्रकल्पाचे साधारण सल्लागार यांना कार्य कालावधीत मेट्रो मार्ग ७ करीता  दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत व मेट्रो मार्ग 2ब करीता दिनांक ३० जून २०२४ पर्यंत मुदत वाढीसाठी, तसेच मुदत वाढीस अनुसरुन कंत्राटीय रकमेत होणाऱ्या वाढीचा प्रस्ताव स्विकारण्यास व त्याअनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

तळोजा एम.आय.डी.सी रोड ते एनएच ४ (जुना) दरम्यानच्या विकास आराखडयातील प्रस्तावित रस्त्याचे बांधकाम करण्यासाठी प्राप्त झालेली निविदा स्विकारण्यास, प्रत्यक्ष कामानुसार संभाव्य भाववाढ अदा करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटीप्रमाणे अधिदान करण्यास कार्यकारी समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

मेट्रो मार्ग -१० ( गायमुख -शिवाजी चौक ( मीरा रोड ) ) आणि मेट्रो मार्ग १२ ( कल्याण- तळोजा) या दोन्ही मेट्रो मार्गाच्या स्थापत्य व प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची नियुक्ती करण्यासाठी कार्यकारी समितीने मान्यता दिली आहे.